**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**November 2020 Special Issue- 29 Vol. I**

# Human Rights

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

**Shaurya Publication, Latur**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 29 Vol I**

**Title of the issue : - Human Rights**

© **All rights reserved with the College & publisher** **Price : Rs. 400/-**

**Editor – Arun Godam**
**Latur**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

**Published BY**
Shaurya Publication
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com , 8149668999

**Printed By.**
**Shaurya Offset**
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com

EDITION :
November. 2020

88. मध्ययुगीन साहित्यातील मानवाधिकार व मूल्ये 240
प्रा डॉ.श्याम नेरकर

89. मानवाधिकार व संत तुकारामांचा मूल्यविचार 243
प्रा.डॉ.रामचंद्र झाडे

90. मराठी कथा स्त्रीवादी साहित्य आणि मानवाधिकार 246
डॉ. एस. पी. जगतवाड

91. मराठी साहित्यातील – मानवाधिकार व मानवी मूल्ये 248
प्रा. डॉ. रुद्देवाड बी. पी.

92. मानव अधिकार आणि भारतीय संविधान 250
प्रा.आवटे भाऊ दगडोबा

93. महिला आणि मानवी हक्क 253
प्रा.(डॉ.) एच.एस.भूमकर, श्री औताडे लक्ष्मण बाबा

94. भारतीय संविधान आणि मानवाधिकार 255
डॉ.लोखंडे बी.बी

95. मानवी अधिकार सद्यस्थिती आणि भारतीय संविधान 258
प्रा.डॉ.आघाव. एन.बी., किशोर कैलास बांबर्डे

96. मानवाधिकार और महिलाएँ 260
प्रा. बबीता मनिष थुल

97. मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटनेतील तरतुदी 263
सूर्यवंशी गणेश दामाजी

98. संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानव अधिकार 266
प्रा.डॉ.पवार रणजित कवरसिंग

99. मानवी अधिकार संकल्पना- विकास, अडथळे आणि उपाय 268
प्रा. डॉ. तात्या बाळकिसन पुरी

100. मानवी हक्क आणि महिला 272
प्रा.डॉ.तांदळे एस.के.

101. स्त्री आणि मानव अधिकार 276
डॉ. बी. व्ही. डोंगरे

102. भारतीय संविधानातील मानवी हक्कांचे प्रतिबिंब 278
प्रा. सुनिता शरद इंगळे

103. मानव अधिकार आणि आदिवासी 279
प्रा.डॉ.उमाकांत ज्ञानोबा वानखेडे

104. अल्पसंख्याक व मानव अधिकार 282
डॉ. जाधव विठ्ठल सखाराम

# मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटनेतील तरतुदी

**सूर्यवंशी गणेश दामाजी**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्री विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर

---

**प्रस्तावना :**

प्रत्येक स्त्री-पुरूष हे समाजाचे घटक असतात. ते एकमेकांवर अवलंबून असतात. हक्क आणि प्रतिष्ठेच्या बाबतीत ते समान असतात. सद्सद्विवेकबुद्धी आणि समाज यांनी ते प्रेरित झालेले असतात, त्यातुनच मानवी हक्कांची संक्ल्पना उदयास आली आहे.

प्रत्येक व्यक्तीला काही गोष्टी मिळविण्याचा अधिकार आहे आणि या अधिकाराला इतरांनी मान्यता दिलेली आहे. अशा अधिकाराला ढोबळमानाने हक्क म्हणुन संबांधले जाते. या हक्कांमध्ये काही हक्क असे असतात. जे व्यक्तीला जन्माने प्राप्त होतात. व्यक्तीला जगण्यासाठी, त्याच्या व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी अशा हक्कांची आवश्यकता असते. हे हक्क व्यक्तीला जन्मानेच प्राप्त झाल्यामुळे ते हिरावुन घेण्याचा अधिकार कोणालाही नसतो. असे हक्क मानव अधिकार म्हणून ओळखले जातात. हे हक्क व्यक्तीला समाज किंवा राज्य बहाल करत नाही. व्यक्ती अस्तित्वात आली की हे हक्क अस्तित्त्वात येतात. मानव अधिकारांचा विकास हा नैसर्गिक हक्क किंवा अधिकारांच्या कल्पनेमधुन झाला. मानव अधिकार म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत. मानवी हक्क हे माणसाच्या व्यक्तीमत्त्व विकासासाठी मानवी मूल्यंच्या जपणुकीसाठी, संवर्धनासाठी, बौद्धिक, वैचारिक व सद्सद्विवेकबुद्धीच्या वाढीसाठी महत्त्वाचे आहेत. तसेच ते मानवाच्या भावनिक, अध्यात्मिक व इतर गरजा भागविण्याकरिता आवश्यक असतात. मानवी हक्कांची व्याप्ती मोठी आहे. यात एकीकडे पारंपारिक हक्क आणि राजकिय हक्क याचा तर दुसरीकडे नव्याने विकसित झालेल्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक या हक्कांचाही समावेश होतो.

मानवी हक्कांची संकल्पना अनेक वर्षाच्या कालखंडात विकसित झाली आहे. मानवी हक्क म्हणजे अनेक पिढ्यांचे योगदान दुर्दम्य इच्छा आणि अनुभव यांचा परिपाक होय. माणसाला माणुस या नात्यानेच जन्मतः काही मुलभूत अधिकार प्राप्त झाले आहे. हे त्याचे नैसर्गिक अधिकार असुन ते हिरावून घेण्याचा अधिकार कोणत्याही समाजाला किंवा राजसत्तेला नाही. हे अधिकार व्यक्तीला जगण्यासाठी त्याच्या व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी आवश्यक आहेत. त्याशिवाय व्यक्तीच्या अस्तित्त्वाची कल्पना करण् अशक्य आहे. हा विचार ग्रीक व रोमण विचारवंतांच्या लेखनातुन, ख्रिस्ती तत्त्वज्ञानामधुन प्रतिबिंबित होतो. नैसर्गिक अधिकारांची कल्पना पुढे सतराव्या शतकात सामाजिक करार सिद्धांताच्या पुरस्कर्त्यांनी उचलुन धरली. या अधिकारांचे समर्थन करण्यात जॉन लॉक, जिन जॅक रूसो सारखे सामाजिक करार सिद्धांताचे पुरस्कर्ते आघाडीवर आहेत. नैसर्गिक आधिकारांची निर्मिती राज्य अस्तित्त्वात येण्यापूर्वीच झाली होती. असा दावा ते करतात. नैसर्गिक अधिकारांना कायद्याचे संरक्षण प्राप्त झाल्यावर या अधिकारांचे दैवी अधिष्ठान संपुष्टात आले आणि हेच अधिकार पुढे मानव अधिकार म्हणून ओळखले जाऊ लागले. इंग्लंडमध्ये तेरावे शतक ते सतरावे शतक या दरम्यान प्रस्थापित अनियंत्रित राजेशाहीला लगाम घालण्यासाठी मानव अधिकारांची कल्पना पुढे करण्यात आली. इंग्लंडमध्ये सन 1215 साली संमत झालेला मॅग्नाकार्टा करार, सन 1628 सालचा पिटीशनऑफ राईटस, सन 1689 सालचा बिल ऑफ राईटस हे ब्रिटीश नागरिकांच्या मुलभूत अधिकारांचे, संरक्षण करणारे आणि राजसत्तेच्या अधिकारावर बंधने आणणारे करार होते. मानव अधिकारांच्या संरक्षणासाठी कायद्याने केलेली ही पहिली तरतुद हेती. यामुळे मानव अधिकारांच्या कल्पनेला कायद्याची अधिमान्यता मिळाली व या अधिकारांना अधिक स्पष्टपणा लाभला. सन 1776 चे अमेरिकन स्वातंत्र्युद्ध तसेच सन 1789 च्या फ्रेंच राज्यक्रांतीमागे मानव अधिकारांच्या संरक्षणाची मुख्य प्रेरणा होती.

मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयीकरणास खऱ्या अर्थाने दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर वेग आला. दुसऱ्या जागतिक महायुद्धादरम्यान आणि त्यानंतर मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाची ही प्रक्रिया अपरिहार्य बनली. संयुक्त राष्ट्रसंघटनेची 1945 साली स्थापना झाली. दुसऱ्या महायुद्धादरम्यान मानव अधिकारांच्या झालेल्या मोठ्या उल्लंघनामुळे स्थापनेपासुनच व संयुक्त राष्ट्र संघटना मानव अधिकारांविषयी संवेदनशील होती. संयुक्त राष्ट्र संघटनेने 10 डिसेंबर 1948 रोजी मानवी अधिकारांचा जाहिरनामा घोषित केला. या जाहिरनाम्यामुळे मानव अधिकारांच्या संकल्पनेला वैश्विक रूप प्राप्त झाले. मानव अधिकार संरक्षणाची जाणीव वैश्विक बनली.

भारत मानव अधिकारांच्या संरक्षणविषयी संवेदनशील असणाऱ्या प्रमुख राष्ट्रांपैकी एक राष्ट्र आहे.भारतामध्ये खंबीरपणे टिकुन असलेली लोकशाही म्हणजे मानव अधिकारांच्या संरक्षणाविषयी भारताची इच्छाशक्ती संवेदनशीलता दर्शविते. मानव अधिकारांविषयीची भारताची संवेदनशीलता भारतीय राज्यघटनेतून प्रतिब्रिंबित होते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मानव अधिकारांच्या जाहिरनाम्यातील बहुतांश तत्तवांचा समावेश भारतीय राज्यघटनेमध्ये आहे. भारतीय राज्य घटनेने नागरिकांना या अधिकारांच्या संरक्षणाची हमी दिली आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये मुलभूत अधिकार व राज्यांचे मार्गदर्शक तत्वे यामधुन मानवी अधिकारांना स्थान देण्यात आले आहे.

**मानवी हक्क आणि राज्यघटनेची उद्देशपत्रिका :**

राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये राज्यघटनेची मुलतत्त्वे आणि तत्वज्ञानाचे प्रतिबिंब उमटले आहे. भारत देश हा सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचा व प्रत्येक नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकिय न्याय मिळेल असे सांगितले आहे. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकाला विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य वदर्जा आणि संधीची समानता असेल असे म्हटले आहे. यातुन मानवी हक्कांना स्थान देण्यात आले आहे.

**मानवी हक्क आणि मुलभुत अधिकार :**

भारतीय राज्यघटनेतील तिसऱ्या भागामध्ये मुलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आला आहे. व्यक्ती स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी व्यक्तीच्या सर्वांगीन विकासासाठी व्यक्तीला काही मुलभूत अधिकार देण्यात आले आहेत. मानवी हक्कांची गरज व महत्व लक्षात घेवून मुलभूत अधिकारांची तरतुद करण्यात आली आहे.

**मुलभुत अधिकार :**

1) संमतेचा अधिकार कमल 14 ते 18.
2) व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार कलम 19 ते 22
3) शोषणाविरूद्धचा अधिकार कलम 23 आणि 24
4) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार कलम 25 ते 28
5) शिक्षण आणि संस्कृतीचा अधिकार कलम 29 आणि 30
6) घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार कलम 32 ते 35

वरिल सर्व प्रकारचे मानव अधिकार घटनेने प्रत्येक व्यक्तीस दिले आहेत. त्या अधिकाराविरूद्ध कोणत्यही प्रकारची कृती करण्यास राज्यसंस्थेला प्रतिबंध घालण्यात आला आहे. जर कोणत्याही व्यक्तीने, संघटनेने, अधिकाऱ्यांने, शासनाने मुलभूत अधिकारावर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला तर त्या विरोधात न्यायालयात दाद मागता येते. सर्व साधारणपणे अधिकारांवर मर्यादा घातल्या जात नाहीत. परंतु राष्ट्राच्या आणिबाणीच्या प्रसंगी उद्‌भवलेल्या परिस्थितीतुन मार्ग काढण्यासाठी वेगवेगळ्या अधिकारांवर मर्यादा घातल्या जाऊ शकतात किंवा काही काळ स्थगित केले जाऊ शकतात. काही प्रसंगी राज्य सरकारही हक्कांवर तात्पुरती नियंत्रणे लादू शकतात. अर्थात या उपाययोजना तात्पुरत्या असुन परिस्थिती निवळली की बंधने काढुन टाकली जातात. 1971 च्या 24 व्या आणि 25 व्या घटना दुरूस्तीनुसार, ``जनतेचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी मुलभूत अधिकारांची व्याप्ती वाढविणे किंवा कमी करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आहे.``

**राज्याची मार्गदर्शक तत्त्वे :**

भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये ही मानवी हक्कांचे प्रतिबिंब दिसुन येते. घटनेच्या चौथ्या भागामध्ये कलम 37 ते 51 मध्ये मार्गदर्शक तत्त्वे नमुद करण्यात आली आहेत. ही मार्गदर्शक तत्त्वे राज्यांसाठी आहेत.

1) कलम 38 मध्ये कल्याणकारी समाज व्यवस्था निर्माण करणे. सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय निर्माण करण्याचा प्रयत्न करणे तसेच सामाजिक दर्जा, समान संधी, सुविधा यातील विषमता नाहीशी करण्याचा प्रयत्न राज्य शासन करील अशीही अपेक्षा या कलमात व्यक्त केली आहे. 2) कलम 39 मध्ये सरकारने स्वीकारलेल्या धोरणाविषयक तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये स्त्री-पुरूषांना समान उपजीविकेचे साधन प्राप्त करून देणे, जनतेच्या हितासाठी भौतिक साधनसंपत्तीचा वापर करणे, समान कामासाठी समान वेतन. स्त्रिया व लहान मुलांना घातक व्यवसाय देण्यास प्रतिबंधक करणे, गरिबांना कायदेविषयक मोफत सल्ला देणे इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे. 3) कलम 40 नुसार सत्तेच्या विकेंद्रीकरणाची शिफारस करण्यात आली आहे. 4) कलम 41 नुसार सर्व नागरिकांना कामाचा, शिक्षणाचा अधिकार मिळवून देणे, बेकारी, व्रद्ध, आजारी व अपंगांना सरकारी मदत मिळवून देण्याचा राज्यांनी प्रयत्न करावा, स्त्रियांना प्रसूतीच्या काळात आर्थिक मदत देणे. इत्यादीची तरतुद करण्यात आली आहे.

5) कलम 43 मध्ये ग्रामोद्योग, कुटीरोद्योग, शेती, व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन देणे. कामगारांना काम उपलब्ध करू देण्याचा प्रयत्न करणे, सामाजिक व सांस्कृतिक विकास घडवून आणणे. 6) कलम 44 मध्ये सर्व नागरिकांना समान कायदा आणण्याचा प्रयत्न करावा अशी आहे. 7) कलम 46 मध्ये सामाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती, अनुसूचित जाती, जमाती यांच्या शिक्षणासाठी विशेष काळजी घेण्याचे आणि त्यांचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचे सूचित करते. 8) कलम 47 नुसार सार्वजनिक आरोग्यावर भर देण्यात आला आहे. आहारातील दर्जा आणि राहणीमान उंचावण्याचा राज्यानी प्रयत्न करावा, अंमली पदार्थावर बंदी घालावी, घातक औषधांवर बंदी घालावी अशी सूचना या कलमात आहे. 9) कलम 48 मध्ये शेतीच्या विकास व पशुसंवर्धन यांच्या बाबतीत आहे. तसेच पर्यावरण सुरक्षित ठेवण्यासाठी पशुपक्षी, वने, जंगले यांचे संरक्षण करावे अशी सूचना या कलमात करण्यात आली आहे. कलम 49 व्या कलमामध्ये राष्ट्रीय स्मारके, स्थळे, वास्तू यांचे रक्षण करणे, त्यांची विटंबना थांबविणे, त्यांची निर्यात थांबविणे इत्यादी नमुद करण्यात आले आहे. कलम 50 व्या कलमात न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था परस्परांपासुन स्वतंत्र राहील यांची काळजी घेण्यास सांगितले आहे. कलम 51 व्या कलमानुसार राष्ट्रराष्ट्रात शांतता राखावी, सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करावे, परस्परांचा आदर बाळगावा, न्यायाने वागावे, आंतरराष्ट्रीय कायद्यांचा मान राखावा, संघर्ष लवादा मार्फत सोडवावेत इत्यादी या कलमात सांगितले आहे. राज्याची मार्गदर्शक तत्त्वे ही प्रामुख्याने आर्थिक किंवा कल्याणकारी, राजकीय तत्त्वे, सामाजिक तत्त्वे, आंतरराष्ट्रीय तत्त्वे म्हणून देखील ओळखले जातात. मार्गदर्शकतत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयात कोणालाही दाद मागत येणार नाही. त्यासाठी न्यायालय आदेश देऊ शकणार नाहीत. परंतु राज्यकारभारासाठी ही तत्त्वे पायाभुत असल्यामुळे राज्यांनी कायदे करतांना या तरतुदींचे महत्व ओळखून कायदे करावेत व हे त्यांचे कर्तव्य राहील असे ही मार्गदर्शक तत्त्वांमध्ये कलमात स्पष्ट करण्यात आले आहे.

**सारांश :**

भारतीय राज्यघटनेमध्ये मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वांमधून मानवी हक्कांच्या जाहिरनाम्याला स्थान देण्यात आले आहे. त्यासोबतच मुलभूत अधिकारांना न्यायालयीन संरक्षण देण्यात आले आहे व मार्गदर्शक तत्त्वातील हक्कांना न्यायालयीन संरक्षण न देता शसनावर त्याची जबाबदारी टाकली आहे. भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातुन सर्वांना मानवी हक्कांची हमी देण्यात आली आहे.

**शिफारशी :**

1) प्रत्येक व्यक्तीच्या मानवी हक्कांचे संरक्षण होण्यासाठी मुलभूत अधिकारांची योग्य व काटेकोरपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

2) राज्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी शाससनाने करावी व प्रत्येक व्यक्तीच्या मानवी हक्कांची पूर्तता करावी.

**संदर्भ :**

1) मानवी हक्क, सिद्धांत आणि व्यवहार, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
2) मानवी हक्क, सद्यस्थिती आणि आव्हाने, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
3) भारत में मानवाधिकार, ओमेगा पब्लिकेशन्स, नई दिल्ली.
4) मानव अधिकार, शिक्षा एवं समाज, आर.बी.एस.ए. पब्लिशर्स, जयपुर.
5) Human Rights, Perspective Plan for 21 Century, Diamond Pocket Book (P) Ltd, New Delhi.